
२९६७

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का. का
दा. क्र. २९६१

BVBK-0402961

सं. वाचनालय, ठाणे.
ग्रं
क्र. २९६७



२९६१
३।३।९४

# पुस्तकांची पेटी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. २९६१ दिनांक ३।३।९४
विषय बा. वा. क्र.

मदन हजेरी

BVBK-0402961

अंजनी प्रकाशन

प्रकाशक-मुद्रक :
सौ. अंजना आ. बुरटे
अंजनी प्रकाशन
बी १६/८ इंदिरानगर, पुणे ३०.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ :
ल. म. कडू

प्रथमावृत्ती :
१४ नोव्हेंबर १९९३

टाइपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२० सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मूल्य रु. १५/-

*.... तुमच्या सर्वच कथांमध्ये*
*अनुभवांचा जिवंतपणा आहे.*
*परिसर सौंदर्य, सहज*
*सुंदर शब्दकळा.*
*लेखकमनातील कारुण्याचा गाभा.*
*दयाळू, परोपकारी स्वभाव.*
*बालमन जाणणारं, घडवणारं*
*शिक्षकमन यामुळे कथा*
*केवळ रंजनप्रधान न ठरता*
*नकळत बोध देतात.*
*वेगळेपणा वाटला खास !*

**– सौ. स्मिता राजवाडे**



मदन रा. हजेरी मु.पो.ता. राजापूर, जि. रत्नागिरी

मुलांमध्ये राहून माझं मन
मूल झाल्यावरच
मी मुलांच्या गोष्टी लिहिल्या.
रानातल्या फुलांसाठी
आडगावची ही मुलं,
थेट गोष्टीत आलीत,
अगदी जशीच्या तशी.
माझ्या
'लहानू'ला राज्यपुरस्कार
तर 'प्रिय पंतप्रधान'ला
बालकुमार साहित्य संमेलन पुरस्कार मिळाला.
'पाऊस'ला पुन्हा राज्यपुरस्कार
तर 'पावा पुन्हा वाजला'ला साने गुरुजी पुरस्कार !
हे आनंदाचं गाठोडं पाठीवर घेऊन जातानाच एक नवीन
'पुस्तकांची पेटी' आणलीय तुमच्यासाठी.
श्रम, साहस, प्रेम, संस्कार
इ. गुणांसाठी तर यातल्या
कथा वाचल्याच पाहिजेत.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २९६९ दिनांक ३/७/३/०८
विषय ...... क्र. ......

# पुस्तकांची पेटी

काळं काळं कातळ टोकाला टेकलेलं आभाळ नितळ निळं निळं.

कातळावर सुकलेलं पिवळं गवत. मधेच गवतात करवंदीचं

झुडूप हिरव्यागार पानांचं. तांबूस पोपटी रंगाचं.

पुन्हा पुढं काळं, काळं कातळं...

कातळावरून सरपटत गेलेली पायवाट. वळत, वळत. खाली, खाली. अगदी डोंगराच्या कुशीत. दरडीला टेकून बसलेली घरं. घरं गवताची. जंगली पानांची. घनवडात विसावलेली. सावली पांघरूण बसलेली.

ही धनगरवाडी.

वाडी तशी आठ-दहा घरांची. पंधरा-वीस पोरांची.

यांतलाच एक धनू.

धनू तायाप्पा गोरे.

बारा वर्षांचा. ठेंगणासा. अंगानं मजबूत. अनवाणी शाळेत यायचा. जाड ओठांतून सुरेख हसायचा. मोठ्यानं बोलायचा. जे बोलायचा ते अशुद्ध असायचं, पण त्याची त्याला तमा नव्हती. जे हवं ते विचारणार. पटलं तर हो म्हणणार. नाहीतर "गुरुजी, हे मला समजलं नाही हो," असं सरळ सांगणार.

धनू असला की वर्ग भरल्यासारखा वाटायचा. बाकीची मुलं तर त्याचंच मानायची. त्याच्यासोबत गायची. रानात जायची. वडाच्या सावलीत खेळ मांडून बसायची. धनू कधी कधी गाणं सांगायचा.

खड्या आवाजात सारी मुलं गायची. धनगरवाडीची घरं आवाजानं भरून जायची.

आज पंधरा ऑगस्ट होता. मी एस. टी.तून उतरलो. पुस्तकाची पेटी खाली घेतली. गाडी निघून गेली. कातळ सारं सुनं झालं. घाम पुसत मी बाजूला पाहिलं. धनू अजून आला नव्हता. पेटी उचलून वडाखाली घेतली. खाली बसणार तोच मुलांच्या बोलण्याचा आवाज आला. धनू पुढं मुलं मागं. जोरात धावत होती. मला पाहून त्यांनाही आनंद झाला. धनूनं पेटी उचलली. डोकीवर घेतली. आणि म्हणाला, "चला, गुरुजी." मुलं मागं-पुढं चालू लागली. मी मागून चालू लागलो.

दरीच्या टोकाला सुटला वारा. वाट अडखळू लागली. मुलं घुटमळू लागली. डोकीवरची पेटी सावरताना धनूची तारांबळ उडाली. सोमा, शैलू हात लावू लागले. पेटी मधेच धरू लागले. तोच आला हळ्दवण्याचा झरा. झुळझुळ पाण्याचा. पाण्यातल्या गुळगुळीत गोट्यांचा. सटासट पाय सटकायचे. तोल जायचा. काठावरचा धनेश मधेच आवाज करायचा. मुलं बघायची. जरा थांबायची. थोडी दचकायची. पण धनूनं पेटी सोडली नाही. दरडीवरून तो हळूहळू गेला. अगदी धनगरवाडीतल्या शाळेजवळ

चार-पाच पालक आले होते. लंगोट लावलेले. पांढरं मुंडासं घातलेले. त्यांतले दोघे जण पेटीकडे बघत होते. मुलं पाणी प्याली. घाम पुसतच जाऊन रांगेत उभी राहिली. झेंडा आधीच बांधला होता. लाखण बाईंनी सर्व तयारी चोख केली होती. मी झेंड्याची दोरी ओढली. झेंडा फडफडू लागला. मुलांनी राष्ट्रगीत म्हटलं. शाळेच्या व्हरांड्यातच छोटी सभा सुरू झाली. पालक भिंतीला टेकून बसले होते. मुलंही रांगेत बसली होती. तशी बाईंनी पेटी उघडली.

मी म्हणालो, "मुलांनो, ही धनाची पेटी आहे. यात खूप धन आहे.

पण हे धन पैशाचं नाही. सोन्या-नाण्याचं नाही."

"मंग कशाचं आहे. गुरुजी ?" धनू मधेच बोलला.

"ज्ञानाचं धन. हे धन पुस्तकांत पेरून ठेवलंय. ती पुस्तकं आणलीत मी तुमच्यासाठी. हे धन दुसऱ्याला दिलं तर कमी होत नाही. जेवढं देईल तेवढं वाढतं. आज ही पुस्तकं धनूचे बाबा सर्वांना वाटतील."

सारी मुलं कान देऊन ऐकत होती. भाषण संपलं होतं. धनूच्या बाबांनी प्रत्येक मुलाला एकेक पुस्तक दिलं. नवं कोरं पुस्तक. रंगीत चित्रं. काही मुलं पुस्तक उघडून पानांचा वास घेऊ लागली. शब्द-शब्द जुळवून तिथंच वाचू लागली. पण मी त्यांना म्हणालो, "तुम्हाला दिलेली एकेक गोळी आता खायची. मात्र घरी गेल्यावर दिलेली पुस्तकं वाचायची. वाचन मोठ्यानं करायचं. उच्चार स्पष्ट करायचे. म्हणजे तुम्हीही भाषण करू शकाल. पुस्तक संपवूनच उठायचं हं..."

माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच मुलं उठली. हिरवं दिसल्यावर मेंढरं धावावीत तशी मुलं धावली. धनूचे बाबा मात्र शांत होते. त्यांनी जवळ येत माझा हात हातात घेतला आणि म्हणाले, "तू पयलाच मास्तर भेटलास. आमची पोरं आता शानी होणारच. आयुक्षवंत हो..."

त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहून मला आनंद झाला होता. लाखण बाईंनी तर पदर डोळ्यांजवळ नेला होता...

त्या दिवशीची सायंकाळ झेंडा उतरवून मी डोंगराकडे जात होतो. तिठ्यावरच्या दुकानात एक निरोप द्यायचा होता.

धनगरवाडीतलं पहिलं घर सोमाचं. सोमा अंगणात बसून मोठ्यानं पुस्तक वाचत होता. मी तेथूनच जात होतो, पण त्याचं लक्षही माझ्याकडं गेलं नाही. मधेच मेंढरं ओरडली, तरी त्यानं पुस्तकातलं लक्ष काढलं नाही. दरडीच्या काठावर आलो. एका मुळाचा आधार घेऊन जसं एखादं झाड उभं असतं तसं धनूचं घर दोन्ही बाजूंनी

पाण्याचे झरे आणि उंच घळईला चिकटून बसलेलं त्याचं घर. तो मला काही घराजवळ दिसला नाही.

मी भराभर गेलो. रानात मेंढ्या चरताना दिसल्या. सायंकाळची वेळ असल्यानं त्या शांतपणे चरत होत्या. वारा चांगलाच सुटला होता. मधेच मोठा वाचण्याचा आवाज येऊ लागला. मी त्या दिशेनं पुढं गेलो. धनू एका कातळाच्या उंचवट्यावर बसून वाचत होता. पळसाच्या पानांतून त्याचा अर्धा चेहराच मला दिसत होता. रानातलं वाचन. मी त्याला पाहतच उभा राहिलो. त्याला ऐकतच थांबलो, खूप उशीर. अखेर त्यानं शेवटचं पान संपवलं. पुस्तक मिटलं. तो सुन्नपणे बसून राहिला. मी हळूच जाऊन त्याच्या पाठीवर थाप मारली. म्हटलं,

"शाब्बास, धनू ! शाब्बास !"

मला पाहून त्याला आश्चर्य वाटलं. "गुरुजी. . ." त्याला पुढचं बोलवेनाही. त्याचा गोल चेहरा बदलला. जाड ओठ थरथरले. डोळे डबडबले आणि त्यानं मला घट्ट मिठी मारली. . .

त्याची मिठी सोडवत मी म्हणालो, "धनू, तू चांगलं वाचत होतास. तू सारी पुस्तकं वाच. म्हणजे खूप, खूप शिकशील. चांगलं भाषण पण करशील."

"गुरुजी, तुम्ही इथं कसे आलात ?" तो.

"अरे, तुझा आवाज ऐकून आलो. चाललो होतो डोंगरात. निरोप द्यायचा होता एक."

"गुरुजी, काय तो सांगा निरोप. मी धावत जाऊन येतो." तो.

"अरे, उद्या दिला तरी चालेल. तू तुझी मेंढरं गोळा कर. चल, जाऊया घरी. काळोख होईल आता."

धनूनं शीळ फुंकली. मेंढरांच्या गळ्यांतले घुंगरू वाजायला लागले. पानांतून, झुडपांतून मेंढ्यांचे धावण्याचे आवाज ऐकू येऊ



लागले. एका क्षणात अठरा-वीस मेंढ्या गोळा झाल्या. त्यानं हातातील काठी वाजवली, तरी ते छोटं पिल्लू मात्र आलं नव्हतं. त्यानं साऱ्यांना हाकारलं. मेंढ्या चालू लागल्या. मी म्हणालो, "अरे, तुझं ते पिल्लू कुठं आहे?"

"ते झऱ्याकाठाला नक्की असणार. त्याला झऱ्याकाठचं गवत आवडतं. झुळझुळणारं पाणी प्यायला आवडतं."

आम्ही तिथं पोचलो. खरोखरच ते पिल्लू झऱ्याकाठी चरत होतं. धनूनं त्याला पकडलं. खांद्यावर घेतलं आणि पलीकडं नेऊन ठेवलं. बाकीच्या मेंढ्या साकवावरून पळाल्या.

मी म्हणालो, "धनू, हे तुझं छोटं मेंढीचं पिलू मला आवडलं."

"का हो, गुरुजी ?" तो.

"माझा धनूही असाच कळपात न राहणारा आहे. म्हणूनच कातळावर बसून त्यानं आज पुस्तक वाचलं. वारा खात. झाडं पाहत. मोठ्यानं वाचलं. या दरीनं, धनगरवाडीनं पहिल्यांदाच शब्द ऐकले."

धनू गहिवरला. तसंच न बोलता आम्ही चालत राहिलो. त्याचं घर आलं. दरडीच्या घरात मेंढरं पटापट गेली. बेड्याजवळ उभा राहून धनू म्हणाला, "गुरुजी, या ना. चाय प्या थोडी."

'उद्या येईन,' असं म्हणत मी छोटा साकव पार केला. घाटीच्या वर गेलो आणि मागं वळून पाहिलं. धनू एकटाच भेदरलेल्या पिल्लासारखा पावठणीजवळ उभा होता. ते रंगीत पुस्तक त्याच्या हातात होतं.

*

# मोठा केशव

दूरदर्शनवर क्रिकेटची मॅच सुरू होती. समोरच्या खुर्चीत छोटा केशव बसला होता. गोरं गोरं अंग कोवळ्या केळीच्या पानासारखं. त्यावर लोंबणारं पांढरट जानवं. डोकीचा गोटा. मध्येच शेंडी आणि भोवताली थोडे काळे लांब केस राखलेले. नुकतीच मुंज झाली होती त्याची.

काशीआईला सोबत हवी म्हणून तो मुंबईला आला होता. तसे सात-आठ दिवसच झाले होते. पण मुंबईचं ते दोन खोल्यांचं घर. साऱ्यांची बंद दारं. यामुळे त्याला अगदीच कंटाळा आला होता. कॉमिक्स वाचायची, पुस्तकं वाचायची, टी. व्ही. बघायचा. सतत तेच ते !

म्हणूनच आज तो खुर्चीत शांत बसला होता. त्याला आज आठवत होतं त्याचं कोतापूर गाव. ते उंच, उंच डोंगर, पोफळीच्या बागा, नारळांनी लगडलेले माड. पाटांतून वाहणारं नितळ पाणी, गोदीनं सारवलेलं अंगण, ओल्या सारवणावरून जाताना पायाला लागलेलं शेण. सायंकाळचा गार वारा. पेटीचे मंद सूर. सारं सारं त्याच्या डोळ्यांपुढे येत होतं.

इतक्यात काशीआईची हाक आली, “केशवा, ऊठ रे बाबा, कपडे बदल. चांगले साडेपाच वाजलेत बघ. आज शिवाजी मंदिरला जायचंय आपल्याला. तुझ्या अंतूमामानं पास पाठवलेत नाटकाचे...”

केशव उठला, जानवं कोपरावर घेऊन त्याला पीळ घातला.

मोरीवर जाऊन हात-पाय धुतले. पंच्यानं अंग पुसलं आणि कपडे बदलून तो तयार झाला. काळपट रंगाची थोडी लांबट चड्डी, त्यावर निळसर रंगाचा अंगरखा आणि डोकीला उंच-गोल टोपी घातल्यानं तो छानच दिसत होता. आईनं त्याला पाहताच एक काजळाची टिकली त्याच्या गालाजवळ लावली. घराला कुलूप घातलं आणि ते दोघेही शिवाजी मंदिरला गेले.

अंतूमामाचं सुंदर नाटक. त्यानं म्हटलेली सुंदर वाक्यं आणि लोकांनी वाजवलेल्या टाळ्या अजूनही केशवच्या कानात वाजत होत्या. त्यातही रंगपटात भेटल्यावर अंतूमामानं पाठीवर मारलेली थाप त्याला आठवत होती. या आठवणीत तो कधी घरी आला, हेदेखील त्याला समजलं नाही.

घरी बाबा आलेच होते. नेहमीप्रमाणे जेवणं झाली. टी.व्ही. बघून झाला. बसल्या ठिकाणीच डोळे झाकू लागले म्हणून केशव खाटेवरच आडवा झाला.

अगदी सकाळीच दारावरची घंटा वाजली. आईनं दार उघडलं तर अंतूमामा दारात उभा .जुना पायजमा. त्यावर पांढरट रंगाचा अंगरखा आणि डोळ्यांवर चाळशी.

मामा आल्याचं पाहून केशव उठला आणि म्हणाला, “मामा, काल खूप टाळ्या घेतल्यास हं. आगदी गावच्या दशावतारातलं काम आठवलं मला.”

“तुला आवडलं ना? मग झालं तर . . केशवा, तुझी पेटी नाहीरे ऐकली बऱ्याच दिवसांत. अजून वाजवतोस ना?” मामा केशवला जवळ घेत म्हणाला.

इतक्यात आई चहा घेऊन बाहेर आली. बाबा पण आंघोळ करून बाहेर आले. अंतूमामाला बघताच बाबांचा चेहरा मात्र लाल झाला.

फुर्र, फुर्र ऽऽ करीत चहा पिऊन त्यांनी बशी टी.व्ही.जवळ ठेवली. पँट चढवली आणि ऑफिसची बॅग उचलली. तोच अंतूमामा म्हणाला, "मी आलो होतो जरा. काम होतं. परवा काशीताईकडं सांगितलेले पैसे मिळतील का ? खरंच अडलंय हो..."

बाबांनी बूट चढवले आणि म्हणाले, "किती दिवस भीक मागत राहणार अजून ? घाम गाळावा लागतो पैशासाठी. जमत नाही तर जा कोतापुरात. . . भिक्षुकी करत फिरा. नट होताहेत नट. . ." मागे न पाहताच ते निघून गेले. मामा मटकन खाली बसला. काशीताई बाहेर आली. तिनं त्याला समजून सांगितलं. म्हणाली, "रहाटाला बांधलेला मोगा आणि मी सारखीच रे, बाबा..."

केशव सारं ऐकत होता. पाहत होता. त्याला बाबांचा खूप राग आला होता. एकदम त्याला काहीतरी आठवलं. तो आईकडे धावत गेला आणि म्हणाला, "आई, मी मामासोबत बाहेर जाऊ का ग ?"

"नको, रे बाबा. आधीच त्याला खानावळीचे भरायला पैसे नाहीत. त्यात तुझा आणि त्रास." आई.

"आम्ही चालत जातो ग. मला तर खूपच कंटाळा आलाय."

"बरं, बाबा. जा तर मग." आई.

केशवने अंतूमामाचा हात धरला. ते पायऱ्या उतरून खाली गेले. केशव म्हणाला, "मामा, मला पेटी देशील का रे वाजवायला. मला गाणीही म्हणता येतात आता."

अंतूमामा त्याला वामन शेवडेकडे घेऊन गेला. त्याची पेटी मागून घेतली. दोन दिवसांत परत करतो म्हणून त्यानं पेटी उचलली. वामन त्याचा जवळचा मित्र होता.


पेटी खांद्यावर घेऊन अंतूमामा निघाला. केशवने बसस्टॉप येताच त्याला थांबायला सांगितलं. मामानं पेटी खाली उतरवून ठेवली.

बसस्टॉपवर उभी असलेली मुलं, स्त्रिया त्यांच्याकडे पाहू लागल्या. "थांब, मामा" म्हणत केशवनं डोकीवरची टोपी उलटी करून समोर ठेवली. पेटी उघडली आणि गायला सुरुवात केली. त्या बारा-तेरा वर्षांच्या मुलाची छोटी बोटं झराझर फिरू लागली. सूर घुमू लागले. गाणं तरारून आलं. कोवळ्या गळ्याचं ते गोड गाणं ऐकायला खूपच गर्दी जमली. लोक केशवची तारीफ करू लागले. केशवनं पेटी थांबवली. डोकीची शेंडी एकदा हलवली. टोपी हातात धरून तो फिरू लागला. साऱ्यांनी खिशात हात घातले. गाण्याला दाद द्यायची म्हणून पैसे दिले. इतक्यात बस आली. सर्वजण तिकडे धावले. पण एक म्हातारी मागे राहिली. ती हळूहळू केशवकडे आली. तिने पाच रुपये त्याला दिले आणि चालू लागली. केशवने तिला नमस्कार केला. मागे वळून पाहिलं. अंतूमामा चष्मा बाजूला करून डोळे पुसत होता. . . "मामा, पैसे मोज आधी. किती झाले बघू या." केशव म्हणाला.

चांगले सत्तर रुपये झाले होते...

पेटी खांद्यावर घेऊन अंतूमामा पुढे चालत होता. त्याच्या पायांचा वेग कमी झाला होता. तोच सिनेमा थिएटर आलं. केशवने पेटी खाली उतरायला सांगितली. पुन्हा गाणी. . . तेच सूर. . . लोकांची गर्दी. . . एकामागोमाग एक अशी चार गाणी त्यानं म्हटली. मुंजा मुलानं म्हटलेल्या गाण्यानं श्रोते तृप्त झाले. तल्लीन झाले. तोच केशवने टोपी हातात घेऊन फिरायला सुरुवात केली. चांगला प्रतिसाद मिळाला. टोपी भरून गेली.

पुन्हा अंतूमामाने पेटी उचलली. ते दोघे एका इराण्याच्या हॉटेलात आले. चहा घेतला. दोन्ही वेळचे मिळून पुरेसे पैसे झाले होते. मामाचा चेहराही आनंदित झाला होता. पण छोट्या केशवला हे जमलं कसं, याचं आश्चर्य वाटत होतं. तोच केशव म्हणाला, "मामा, आता पेटी



देऊन टाक तुझ्या मित्राला. काम झालं आपलं. परवा शिवाजी मंदिरजवळ ढोलकी वाजवणाऱ्या मुलाला पाहिलं होतं. त्यावरून ही युक्ती सुचली."

दोघांनीही उठून चालायला सुरुवात केली. वामन शेवडेकडे पेटी

देऊन ते घरी परतले. केशवने आईला दोन ताटं करायला सांगितली. वरण-भात दोघांनीही ओरपून खाल्ला. थंडगार फरशीवर बसून जेवणाऱ्या मामाकडे केशव निरखून पाहत होता. सारं भाताचं भांडं दोघांनी संपवलं, जेवण संपताच केशव म्हणाला, "आई, मला गावी पाठव ना ग . इथं कंटाळा आलाय मला. आजी पण तिकडं एकटीच आहे. माझी शाळा पण उगीच बुडते. बाबांना तूच सांग आज."


ठरल्याप्रमाणे चार दिवसांनी केशवला तिकीट मिळालं. अंतूमामाच त्याला सोडायला आला होता. हरिभाऊ जोशींची सोबत केशवला होती. रात्री आठ वाजता मुंबई सेंट्रलला ते गेले. गाडी लागलीच होती. अंतूमामानं केशवला हरिभाऊंच्या स्वाधीन केलं आणि म्हणाला, "भाऊ, कोतापूरच्या पत्रावळीवरचा द्रोण आहे हो माझा केशव. जपून न्या !"

केशवने मामाला नमस्कार केला. खिडकीतून लोंबणाऱ्या त्या कोवळ्या बोटांना अंतूमामानं कुरवाळलं आणि गाडी निघाली. पाठमोऱ्या गाडीकडे तो पाहत होता. छोटा केशव अंतूमामाच्या नजरेसमोर मोठा मोठा होत होता.

*

# कमळाचं चित्र

छोटा राहुल चित्र काढत होता. रंगांच्या कांड्या कागदी पेटीतून बाहेर आल्या होत्या. काही इकडे, काही तिकडे. कोपऱ्यात सारे रंगच रंग झाले होते. पांढरट रंगाचा एक कागद पडला होता. त्याचा एक



कोपरा मोडला होता. त्यावर एक कमळाचं चित्र काढलं होतं. निळ्या पाण्यात लाल गुलाबी रंगाचं फूल. सारा पसारा टाकून तो मधेच उठत होता. टी. व्ही.चं बटन दाबत होता. इकडे टी. व्ही., तिकडे चित्र. पण यातही त्याचं मन रमेना. तो उठला आणि सरळ बागेत गेला. छोटे छोटे दगड गोळा केले. इकडे-तिकडे फेकले. पुन्हा घरात गेला. तोच आजोबा दारात उभे.

"काय राहुल, कशी वाटते सुट्टी? यायचं का माझ्यासोबत फिरायला? अरे, चल. नाहीतरी तुझ्या आईबाबांना वेळ नाहीच. मग बदल बघू कपडे. आज आपण दूर फिरायला जाऊया."

राहुलनं होकार दिला. तो त्याच्या खोलीत गेला. जाताना दोन-चार रंगीत खडू त्याच्या पायाखाली चिरडले. आजोबाही त्याच्या मागोमाग गेले. त्यांनी त्याचा पसारा पाहिला. सारं आवरून ठेवलं. त्याचं चित्र पाहून म्हणाले, "अरे, आज आपण तळ्याकाठीच जाऊया चल. किती छान कमळं आलीत बघ तिथं."

"आजोबा, कमळाचं फूल आणि पानंच तेवढी पाण्यावर दिसतात, त्याखालील वेल कशी असते हो?" आजोबा त्याच्याकडे एकटक पाहत होते. तो म्हणाला, "आई म्हणाली, तिचे गुरुजीही पाण्यावर एवढंच कमळाचं चित्र काढायचे. बाबांनीही तसंच सांगितलं. अहो, एवढंच काय, माझ्या बाईंनी पण असंच चित्र काढलं. त्या म्हणाल्या, पाण्याखाली काय असतं हे तुला काय करायचं? आणि सारी मुलं हसली मला. आजोबा, सांगा ना हो तुम्ही?"

"चल, सांगतो तुला. झालं तुझं आवरून? सांग तुझ्या आईबाबांना."

दारातूनच ओरडून सांगत राहुल बाहेर आला.

ते दोघेही घराबाहेर पडले. घरं पार केली. बंगले पार केले. डांबरी

रस्ते संपले आणि कच्चा रस्ता सुरू झाला. राहुलचे स्लीपर्स माती-वाळूवरून निसटू लागले. त्यानं आजोबांचं बोट पकडलं. छोटासा चढ चढून गेल्यावर हिरवीगार झाडं दिसू लागली. हिरवं हिरवं गवत दिसू लागलं. पांढरे बगळे आणि निळं निळं पाणी. कितीतरी मोठं तळं. ते तळं बघून तो खूपच खूष झाला. तोच एका कोपऱ्यात त्याला रुंद हिरवी पानं आणि लाल-गुलाबी फुलं दिसली. अगदी जिवंत कमळं !

तिथं जाताच आजोबांनी अंगरखा काढून ठेवला काठावर. पिशवी-टोपी राहुलकडे दिली आणि ते पाण्यात उतरले. छानपैकी पोहत जाऊन त्यांनी सारं पाणी घुसळून टाकलं. मधेच आजोबा खाली बुडाले. पाण्यावर नुसते बुडबुडे उरले. राहुलला भीती वाटली. तो "आजोबाऽऽ" करून ओरडू लागला, पण खळ्कन पाणी वाजलं. अगदी काठाजवळ आजोबा वर आले. त्यांनी कमळाची वेल काठावर फेकली. हळूहळू चालत ते बाहेर आले. अंग पुसून त्यांनी धोतर बदललं आणि सांगू लागले-

"राहुल, हे बघ. हे छोटं काळं दिसत ना, ते कमळाचं खोड आहे. या खोडालाच म्हणतात कमळ्काकडी. तळाशी चिखलात असते ती ! खाद्य साठवणारं हे खोड काही ठिकाणी लोक बटाट्यासारखं उकडून खातात. याला बियाही येतात. भोवऱ्याच्या आकाराच्या एका भागात वीस एक खोबणी असतात. खोबणीत बिया दिसतात. त्यांना 'कमलाक्ष' म्हणतात. त्यादेखील खूप पौष्टिक असतात. म्हणजे कमळाचं फूलच नव्हे, तर त्याचं खोडही उपयुक्त असतं. या खोडालाच एक नळीसारखा दांडा निघतो. तो थेट पाण्यावर येतो. पानांना आणि फुलांना पाण्यावर पोहोचवतो. फुलांनी सुंदर दिसावं म्हणून त्यांना तो मदत करतो. ही हिरवीगार पानं पाण्यात राहूनही कुजत नाहीत."

"का हो आजोबा, कुजत नाहीत ही पानं ?" राहुल.

"अरे, ही पानं सतत तेलकट द्रव बाहेर सोडतात. त्यामुळे ती गुळगुळीत होतात. त्यावर पाणी राहतच नाही. पाऱ्यासारखं बाजूला जातं अगदी. म्हणून पानं कुजत नाहीत. देठ मात्र कसे काटेरी दिसतात बघ."

"हो, आजोबा." म्हणून त्यानं मान डोलावली.

"अरे, कमळाचा सुवास मंद असतो. कमळ हुंगल्यावर धडधडू लागलं ना की, कमळफुलाच्या फाटांचा काढाही देतात."

"म्हणजे कमळ औषधी पण आहे, म्हणायचं तर !" राहुल म्हणाला.

"होय, राहुल." आजोबा पुटपुटले. आई-बाबांना जे माहीत नाही, बाईंना जे ठाऊक नाही, ते आजोबांना ठाऊक आहे, म्हणून राहुलनं आजोबांचा हात हाती घेतला. त्याची पापी घेतली. त्याचे डोळे डबडबले. आजोबा पण गहिवरले. त्यांनी त्याचे डोळे पुसले आणि म्हणाले, "राहुल, या कमळाला असंख्य पाकळ्या असतात. गावोगावी असणाऱ्या तळ्यात छोटी-मोठी कमळं असतात. त्यांच्यातही वेगळेपणा आहे. पण साऱ्या पाकळ्या एकत्र राहिल्या तरच त्याचं फूल शोभून दिसतं. कुणी छोटा, कुणी मोठा. हे चालायचंच. तुझी आई काय, बाबा काय, तू आणि मीदेखील. सारे एकत्र राहतो म्हणून आपलं कुटुंब. जसं कुटुंब तसं फूल."

"हो, आजोबा. मी आजपासून रोज तुमच्यासोबत फिरायला येणार - चालेल ना ?" राहुल म्हणाला.

"अरे, छानच झालं. रोज फिरूया आपण. म्हणतच ते घरी परतले."

*

२९९७

# फुलपाखराची गोष्ट

निळसर डोंगर. त्याच्या पायथ्याला झरा. झुळझुळणारा झरा. झऱ्याकाठी होतं गवत. हिरवं हिरवंगार. डोलायचं फार. गवतावर होती लालसर फुलं. फुलं वाऱ्याने हलायची. गवतावर झुलायची. त्यांच्याचकडे पाहत बसली होती चिमी. चिमी, इवलंसं फुलपाखरू ! निळसर रंगाचं. अगदी नाजूक. छोट्या फुलाच्या पाकळीएवढं. एकटंच एका काडीवर बसलं होतं. कधी पंख मिटायचं. कधी उघडायचं. मागच्या शेपट्या हलवायचं. स्वतःच्या रंगाकडं बघून स्वतःच हसायचं.

आज चिमीचे सारे मित्र दूर गेले होते. म्हणजे 'ते' चिमीला सोडून नव्हते गेले, तर चिमीच त्यांना सोडून राहिली होती. तिला नेहमीच असं एकट्यानं राहणं आवडायचं. आज तिनं ठरवलं होतं, गावाजवळच्या बागांतून जायचं दूर. अगदी दाट दाट वनात. हिरव्या मखमली रानात. ती उठली. मजल दरमजल करत निघाली. खूप वेळानं थांबली, एका बांबूच्या बनाकाठी.

उंच उंच बांबू. हिरवीगार टोकदार पानं. करकरणारा आवाज. बांबूतून घुसणारा वारा. फिरायचा झराझरा. त्याला पाहून चिमी थोडी थांबली. हळूच पंख मिटून बनाकाठी बसली.

जोराचा वारा आला. करकरणारा आवाज झाला. चिमी जागी झाली. पंख पसरून निघाली. तोच डोंगरात तिला पिवळी पिवळी फुलं दिसली. हिरवी पानं नसलेलं, पिवळ्या फुलांनी भरलेलं सुंदर झाड पाहून चिमी जरा थांबली. या फुलावरून त्या फुलावर नाचली. लांब

लांब शेंगा, काळ्या काळ्या फार. त्यांच्यावर बसून, झोका घेतल्या चार. इतक्यात तिला कुणाचा तरी आवाज आला. कोण तरी मुसमुसून रडत होतं.

ती गेली खाली. त्या झाडाखाली तिला एक मुलगी दिसली. "काय ग तुझं नाव ? का अशी रडतेस ?" तिचे डोळे पुसत चिमी म्हणाली.

"माझं नाव शमा. अग, माझा रंगीबेरंगी लालसर पतंग. वाऱ्यावर



डुलत होता. उंच उंच डौलानं आभाळात जात होता. तोच त्याचा दोरा तुटला. तो गेला उडत उडत. त्याच्या मागे मी आले. धावून धावून इथं थांबले. या उंच चिंचेच्या झाडावर तो अडकलाय. पण मला तर वर चढता येत नाही. काय करू ?" ती म्हणाली.

चिमीला खूप वाईट वाटलं. तिनं आपले इवलाले पंख हलवले. मागील शेपट्या हलवल्या आणि म्हणाली, "तू इथेच थांब. येते मी घेऊन पतंग."

तिने पंख उघडले. या फांदीवरून त्या फांदीवर तरंगत तरंगत, गोल गोल गिरक्या घेत, चिमी गेली वर. खूप वेळ शमा तिला पाहत होती. पण पुढे पुढे ती दिसेनासी झाली. दाट दाट पानांतून गायब झाली.

थोडं थांबत थांबत चिमी गेली. तर तिला दिसला एक रुंद पतंग. पांढरट रंगाचा. त्यावर काळे पट्टे असलेला. तिने जवळ जाऊन पाहिलं. त्यावर बसून पाहिलं. इकडून-तिकडून पंख हलवून पाहिलं, पण तो पतंग काही हलेना. निराश होऊन चिमी बसली. पंख मिटून घेतले. तोच तिला एक गोगलगाय दिसली. पाठीवर ओझं घेऊन ती जात होती. तिला थांबवून चिमी म्हणाली, "गोगलगायी, गोगलगायी, मला करशील का ग मदत ?" तिने मागे वळून पाहिलं. इवल्याशा पंखांचं फुलपाखरू तिला दिसलं. ते निळसर रंगाचं फुलपाखरू शमासाठी एवढं उंच आलंय हे ऐकून तिला खूप आनंद झाला. तिनं हळूहळू जाऊन पाहिलं, तर त्या पतंगाचं एक टोक फांदीला टेकलं होतं. काम तसं अवघड होतं.

गोगलगाय आधी गेली फांदीवर. हळूहळू आली फांदीखाली. पुढील दोन टोकांनी हळूच पतंगाला ढकललं. तोच आला जोराचा वारा. गोगलगायीचा आधार सुटला. ती खाली येऊन पडली. जिथं छोटी ढोल होती आणि चिमी बसली होती. त्या आवाजानं चिमीनं

पंख उघडले. पाहिलं तर गोगलगाय सरळ होत होती. तिनं पतंग खाली ढकलला हे ऐकताच चिमीचा आनंद गगनात मावेना. तिनं गोगलगायीचा निरोप घेतला. उडत उडत खाली आली. शमाच्या खांद्यावर बसली. तरी शमा निराशच. वाऱ्यावर उडणारे तिचे केस. डोळे भिरभिरणारे. पापण्या फडफडणाऱ्या. चिमी म्हणाली, "अग, तो बघ पतंग तुझ्या मागे पडलाय..." झटकन शमा वळली. धावत जाऊन तिनं पाहिलं, तर झुडपात एका भीमपंखी फुलपाखराचं पंख पडलं होतं. ते रुंद पंख, पांढरट, काळ्या पट्ट्यांचं, लाल ठिपक्यांचं, मऊ मऊ छान. तिनं हळूच उचललं. गालावरून फिरवलं. त्या छोट्या चिमीकडं पाहत म्हणाली, "अग, हा पतंग नाही. हे तर 'भीमपंखी' फुलपाखराचं पंख आहे..."

हे ऐकून चिमीला खूप वाईट वाटलं. थोडा विचार करून ती म्हणाली, "थांब, शमा. मी पुन्हा वर जाईन, तुझा पतंग घेऊन येईन." असं म्हणून तरंगत तरंगत ती वर गेली. खूपच वर होता जोराचा वारा. त्यामुळे ती खाली आली. ती वर जायचा प्रयत्न करायची, पण वाऱ्यानं पुन्हा खाली यायची. असं खूपदा झालं. अखेर निराश होऊन, पंख मिटून ती शांत बसली. काय करावं तिला कळेना.

खूप वेळ गेला. खारीच्या सरसर आवाजानं ती जागी झाली. बुंध्याभोवती गोल गोल फिरत ती वर गेली. इतक्या वर की झाडाच्या शेंड्याला ती पोहोचली. तिनं पाहिलं. हिरवंगार दाट जंगल. इतकं जंगल तिनं कधीच पाहिलं नव्हतं. तिच्या मागच्याच बाजूला तो लाल रंगाचा पतंग तिला दिसला. तिने त्याला धक्के दिले. त्याच्यावर बसून पाहिलं, पण पतंग काही हलेना. गोगलगाय पण तिला दिसेना. इतक्यात तिनं पाहिलं. छान छान पंखांची, ठिपक्यानं भरलेली रंगीबेरंगी पाच फुलपाखरं. त्यांना चिमीनं बोलावलं, "हे फुलपाखरांनो,

मला थोडी मदत कराल का ?"

ते पाच भाई होते. पाच भाई म्हणजे पाच फुलपाखरं ही दाट जंगलात राहतात. केवळ झाडांच्या शेंड्यांवरून फिरतात. पण चांगली ताकदवान असतात. एकीनं राहिल्यानं त्यांची ताकद आणखीनच वाढते. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "चिमी, तू एवढ्या वर कशी काय आलीस ?" आपलं नाव माहीत असलेलं पाहून चिमी खूपच खूष झाली. तिनं घडलेली सारी हकीकत त्यांना सांगितली. पाच भाईंना चिमीचं कौतुक वाटलं. अभिमानही वाटला. ते म्हणाले, "अग, घाबरू नकोस. आम्ही तुला मदत करू."

ते पाचही जण एकत्र आले. पतंगाच्या एका बाजूवर बसले. रुंद पंखाचे ताकदवान पाच भाई त्यावर बसून लागले पंख हलवायला. शेपट्या डोलवायला. थोडे उडून पतंगावर पडायला. आणि काय, पतंगाची एक बाजू निसटली. पतंग लोंबकळू लागला. चिमी पाहत होती. सारे एक होऊन बसले. पतंग खाली आला. पण त्याचा दोरा अडकला होता एका छोट्या फांदीत. तो कसा निघणार ?

ती पाचही फुलपाखरं गोल गोल फिरली. एकमेकांच्या पंखावर आली. एकाने पंख अडकवला दोऱ्यात. दोरा लागला हलू. दुसऱ्यानं पंखाची उघडझाप केली आणि जोरानं वारा आला. पाच भाई पण झटकन पुढे आले. दोरा गेला सुटून. पतंग लागला जायला खाली. त्या लालसर पतंगाकडे पाहत होती चिमी. तिचं सारं अंग थरथरत होतं. पाच भाईंच्या एकत्र येण्यानं पतंग सुटला. चिमीनं त्यांचा निरोप घेतला आणि ती हळूहळू खाली आली.

फांद्यांतून, पानांतून वेगानं गेली. अगदी शमाजवळ शमानं झुडपावर पडलेला पतंग घेतला. चिमीची पापी घेतली. तिला गालांवरून, डोळ्यांवरून नाचवलं आणि अलगद सोडून दिलं.

शमाच्या अश्रूंनी चिमीचे पंख झाले ओले. ती म्हणाली, "चिमी, आज तुझ्यामुळं माझा पतंग मिळाला. मी तुझे आभार कसे मानू ?"

चिमीने पंख फडफडत सांगितलं, "शमा, पाच भाई या फुलपाखरांमुळं तुला पतंग मिळाला. माझ्यामुळं नाही. अग, मलाही तुझ्यामुळे समजलं. एकजूट करून जर आपण राहिलो, तर कोणतीही गोष्ट मिळविता येते. आपलीशी करता येते. मीसुद्धा आजपासून एकटी नाही राहणार. माझ्या मित्रांसोबत जाणार."

पंख पसरून चिमी उडाली. पानांतून, फुलांतून, झाडांतून, माडांतून तरंगत निघून गेली. शमा तिच्याकडे एकटक पाहत होती. तो लालसर पतंग सावरत होती. एवढ्याशा फुलपाखराने केलेली मदत आठवत होती. त्या आठवणीने तिचे डोळे भरून आले. डोळे पुसत पुसत दाट वनातून वाट काढत ती घराकडे परतली.

*

# मऊ उशी

बाबी आईच्या मागून चालत होती. पायवाट अरुंद होती. आजूबाजूची झुडपं तिला घासत होती. अंगावर ओरखडे उठत होते. खरं तर तिला पुढं जायचं होतं. पण पुढं जायला जागाच नव्हती. अखेर एकदाचा डांबरी रस्ता आला. बाबीला वाट सापडली. ती म्हणाली, "आई, मी तुझ्यापुढं चालते बाई. मला भीती वाटते मागं राहून..."

आई तिच्याकडे पाहत होती. बाबी पुढं चालत होती. धबाल्या फुलांचा मोठा परकर. त्यावर विटकरी रंगाचं पोलकं, पाठीवर फाटलेलं. केस वाऱ्यावर उडणारे. पण सतत काही ना काही विचारत जाणारी बाबी. ती आता चांगलीच उंच वाटत होती. पाचवीतून सहावीत गेली. वर्गात दुसरी आली. पुस्तकं नसताना, खूप घरकाम असतानाही तिनं नंबर सोडला नाही, म्हणून तिच्या आईला अभिमान वाटत होता.

आज बाबीला घेऊन ती खोतांकडे जात होती. बापू खोतांकडे मुंबईहून बरेच पाहुणे आले होते. त्यांत मुलंही अनेक होती. पण लहान मुलाला सांभाळायला, केरवारे काढायला त्यांना मुलगी हवी होती. तेवढंच महिनाभर पोटाला मिळेल. अंगात घालायला एखादं परकरपोलकं मिळेल. पाटी-पुस्तकाला चार पैसे होतील, असं तिला वाटत होतं.

लोखंडी साकव ओलांडला. बोरवणकरांची घाटी ओलांडली. खाडीच्या गुडघाभर पाण्यातून त्या पलीकडे गेल्या. काठाच्या पायंड्यावरून बाबी भराभर वर चढली. आईही तिच्यामागून गेली.

हिरवेगार माड. उंच उंच पोफळी. नितळ पाण्याचा पाट. उंच सखल केलेल्या वाटेतून जाताना बाबीला मौज वाटत होती. एका बाजूला कुंपण, दुसरीकडं शांतपणे चाललेलं पाटाचं पाणी, नितळ नितळ पाणी. तिला राहून राहून वाटत होतं, पाटातून चालावं. तसा एकदा तिनं पाटात पाय घातलाही. पण आई म्हणाली, "अग, वरून चाल. पाणी गढूळ नको करूस."

तोच विहीर दिसली. काथ्याचा दोर लाकडी रहाटावर लोंबत होता. बाजूला तगरीची, अनंताची हिरवीगार झाडं वाढली होती. विहिरीच्या समोर एक रुंद दगड घातलेला होता. दगडाची डोण बाजूला दिसत होती. डोणीत अर्धंच पाणी दिसत होतं. दोन-चार पावठण्या चढून ती वरच्या अंगणात गेली. पुन्हा दोन पावठण्या ओलांडल्या आणि पडवीत आली. चांगली ऐसपैस पडवी. पडवीत मध्यभागी झोपाळा लोंबत होता. लाकडी झोपाळा. त्यावर बसून झोके घ्यावेत, गाणी गावीत, असं वाटत असतानाच तिला आईची हाक आली- "अग, ती उरलेली भांडी आण."

बाबीनं झटपट भांडी गोळा केली. भांड्यानं भरलेली पातेली घेऊन ती विहिरीवर गेली, तर आई म्हणाली, "बाबी, भांडी ठेव. तिथं कोपऱ्यात वाढवण असेल ती घे आणि झाडून काढ सारं घर."

परकाराचे ओचे उचलून तुरुतुरु धावत बाबी गेली. तिनं वाढवण घेऊन घर झाडायला सुरुवात केली.

पडवी, मधलं घर, देवघर झाडून झालं. थोरल्या आईची खोली पण तिनं झाडली. पलंगाखाली जाऊन सारा बारीक-सारीक कचरा काढला. पलंगावरची चादर सरळ केली. उशी उचलली, तर काय ! ती उशी इतकी मऊ होती की बस्स ! तिनं ती निळसर रंगाची उशी सरळ ठेवली. गादीवर हात ठेवला. गादीही मऊ वाटली. तिला वाटलं, एकदा

बसून तर बघावं. तिने वाकून इकडं-तिकडं पाहिलं. गादीवर बसली. हळूच आडवी झाली. उशीवर डोकं टेकलं. अगदी गोष्टीत वाचलेल्या बिछान्यावर झोपल्यासारखं तिला वाटलं. तोच दारातून थोरली आई आत आली. बाबीला गादीवर पाहून तिचा राग अनावर झाला. तिनं वाढवण उलटी धरली आणि तिला चांगलंच झोडपून काढलं. "गादीवर झोपशील ? पुन्हा असं करशील ?"

थोरल्या आईच्या आवाजानं पाहुणे, मुलं जमा झाली. बाबीची आईपण भांडी टाकून आली. पाहते तर बाबी थरथरत होती. थोरली आई भडकली होती. इतक्यात ती गरजली, "लक्ष्ये, या कारटीला आणू नकोस उद्यापासून. अगं, माझ्या गादीवर, उशीवर डोकं ठेवून झोपते म्हणजे काय ? अग सोवळ्याचं असतं माझं सारं . ."

"नाही, थोरली आई. नाही होणार असं यापुढं," म्हणून बाबीच्या काखोटीला धरून ओढतच तिला बाहेर नेलं. पाठीत एक धपाटा घातला आणि तिला पडळीतून खाली ढकलून दिलं.

मुंबईहून आलेला माधव हे सारं पाहत होता. ते थोरल्या आईचा नातू होता. त्यानं विहिरीवर जाऊन लक्ष्मीला शांत केलं. बाबीला हाक मारली. पण तिनं मागं फिरूनही पाहिलं नाही. ती दाणदाण पाय आपटत आगरातून निघून गेली. माधव एकटक तिच्याकडे पाहत होता.

रात्री घरात जाताच लक्ष्मीनं पाहिलं. बाबीनं भात-पिठलं करून ठेवलं. छोट्या राणूला भरवून ती त्याला झोपवत होती. मांडीवर डोकं ठेवून तो पडला होता. लक्ष्मीनं न बोलताच ताटं घेतली, वाढून घेतलं. दोघी मायलेकी जेवल्या. कुणीच कुणाशी बोललं नाही. तशाच दोघी जाऊन धोंगडी सरळ करून झोपल्या.

दुसरा दिवस उजाडला. सकाळचं जेवण आटोपून लक्ष्मी खोतांकडं कामाला गेली. बाबी उठली. तिनं राणूला उठवलं. आई कामाला

गेल्याचं तिला समजलं. आपण आईशी काहीच बोललो नसल्याबद्दल तिला वाईट वाटलं. उठून पातेल्यातला काळा चहा तिनं घेतला. राणूला



पाजवला. अंगणातल्या शेळीला सोडलं. शेळीची पिल्लंपण टणाटण उड्या मारू लागली. राणूचा हात धरून ती शेळीच्या मागे जाऊ लागली. वाडी सोडून ती बरीच दूर आली. तिला टेकडीवर एक उंच झाड दिसलं. त्याला पानं अजिबात नव्हती. पण झाडाखाली मात्र पांढरा कापूस पिंजून ठेवल्यासारखा दिसत होता. वाऱ्यावर तो भुरुभुरु उडत होता. ती पाचोळ्यातून पुढं गेली. वाऱ्यानं उडणारा कापूस उचलला. मऊ रेशमासारखा कापूस. तिनं हावरटपणानं गोळा केला. राणूनं पण तिला कापूस आणून दिला. तिच्या ओच्यात आता कापूसच कापूस झाला. ती झाडाखाली बसली. तिनं कापसातल्या उरल्या-सुरल्या बिया काढून टाकल्या. बिया सुळ्कन निसटायच्या. त्यांतल्या काही बिया तिनं कमरेला खोचूनही घेतल्या.

शेळीला झाडपाला घेतला आणि ती घरी गेली. राणूला खायला दिलं. शेळीला पाणी पाजलं. आपण जेवली आणि अन्न झाकून ठेवलं. शाळेचं दप्तर काढलं. त्यातली पुस्तकं काढली. पांढरट-काळ्या कपड्यांच्या तुकड्यांची तिची पिशवी. ती पिशवी तिनं उलटी केली, तर ती जास्तच नवी दिसू लागली. पण आतल्या बाजूचे दोरे लोंबताना दिसू लागले. तिनं कोयतीवर सारे दोरे, जास्त झालेल्या कडा कापल्या. फाटीतला कापूस पिशवीत भरला. मऊ मऊ कापूस हाताला लागू लागला. घरातील सुई-दोरा घेऊन तिनं पिशवीचं तोंड शिवलं. बंद कापून टाकले. पिशवी गालाला लावली.

ती मऊ-मऊ पिशवी या गालावरून त्या गालावर फिरवली. ती जमिनीवर ठेवून त्यावर डोकं ठेवलं. झटकन तिला कालची घटना आठवली. . . थोरली आई. . वाढवणीचा मार . . तिच्या गालावरून अश्रू ओघळू लागले.

ती डोळे पुसत उठली. केस मागे सारले. शेजारच्या रत्नाला हाक

मारली. तिला उशी दाखवली. तिलाही खूप आनंद झाला. दोघीही खूप वेळ बोलत बसल्या. बाबीनं घोंगडी रुंद केली. दार पुढं केलं आणि राणूजवळ ती आडवी झाली. मऊ मऊ उशीवर डोकं ठेवून...

दुपारची वेळ बाबीची आई घरी आली. तिनं दार लोटलं, तर राणू आणि बाबी झोपली होती. ती जवळ गेली. राणूच्या डोकीतून हात फिरवला. पदरानं त्याचा घाम पुसला. तोच तिच्या मांडीला काहीतरी मऊ लागलं. तिनं मांडी वर उचलून पाहिलं, तर शाळेच्या पिशवीची छान छान मऊ उशी. इतकी मऊ उशी तिनं पाहिलीच नव्हती. बाबी त्यावर शांत झोपलेली.

झोपेतही तिचा चेहरा गोड दिसत होता. तिचाही घाम तिनं पदरानं पुसला. तिचे डोळे भरून आले. आपण काल उगीच पोरीला मारलं असं वाटू लागलं. तोच डोळ्यांवर प्रकाशाचा कवडसा आल्यानं बाबी जागी झाली. तिनं उठून पाहिलं रत्ना कधीच निघून गेली होती. मागे वळून पाहताच तिला आई दिसली.

ती आनंदून म्हणाली, "आई, मी उशी केली. रानातल्या सावरीच्या कापसाची उशी..." तिच्या आईनं उशीसह बाबीला जवळ ओढलं. तिला पोटाशी कवटाळलं. खूप वेळ मायलेकी मिठी मारून बसल्या होत्या. बाबीच्या पाठीवर आईच्या डोळ्यांतले अश्रू ओघळत होते...

*

# बालवीर अंतू

रानडे वठारात गंगा आजी राहत असे. ती खूपच कडक स्वभावाची होती. त्यामुळे तिच्याकडे सहसा कुणी जात नसे तिच्या अंगणातल्या कोणत्याही वस्तूला हात लावत नसे. तशी गंगा आजी स्वतंत्र होती. तेवढ्या मोठ्या घरात एकटीच राहायची. बावकराची लक्ष्मी तिच्याकडे धुणे-भांडी करायची. तीच काय ती टिकून होती आजीकडे. एरवी कामालासुद्धा माणूस जायचे नाही तिच्याकडे.

तो रविवारचा दिवस होता. सकाळीच लक्ष्मी अंतूला घेऊन आजीकडे गेली. वोक्तीने पाणी काढून छोटी डोण भरली. अंतूचे पाय धुतले. तोंड धुतले. पदरानेच तोंड पुसले आणि ती पावठण्या चढून वर गेली. झोपाळ्यावर बसून आजी झोका घेत होती. मनाशीच काहीतरी पुटपुटत होती. लक्ष्मीची चाहूल लागताच ती म्हणाली, "गो लक्ष्मे, अंतूला पण चहा टाकलाय. आधी त्याला चहा दे..."

तिनं अंतूला चहा दिला. आपणही प्याली आणि आजीकडे जाऊन म्हणाली, "गो, काकू, कोणता पाचोळा गोळा करायचा ते सांग."

"हे बघ रे, समोरच्या फणसापासून ते पोफळीपर्यंत सारं छान झाडायचं. मधे मधे ढीग करायचे आणि ते जाळून टाकायचे. आगरातला रातंबीकडचा भाग देवाचा आहे. तिकडे लक्ष्मी-नारायणाकडं जायचं नाही. त्याला शिवायचं नाही."

हातात लांब काठी घेऊन अंतू गेला. त्याचे छोटे छोटे पाय उतरत उतरत दिसेनासे झाले...

आजी म्हणाली, "लक्ष्मे, अग सारं काम झाल्यावर अंतूला दहा रुपये देईन हो. चालेल ना? नाहीतर बसशील भांडत. आधीच पैऱ्याचे पैसे ठरवून टाकले. एकदाच चहा मिळेल हो... अग आज कशेळीचे शिकरकाका येणार आहेत. जा, लवकर दूध काढून घे म्हशीचं."

लक्ष्मी आपल्या कामाला निघून गेली.

छोटा अंतू. बारा-तेरा वर्षांचा. ठेंगणासाच पण काटक. पडेल ते काम करणारा. झाडावर झराझर चढणारा. लहानपणीच वडील गेल्याने सारी कामे शिकलेला. आज मन लावून काम करत होता. कामाचे पैसे मिळतील. मग शिंप्याकडून नवीन अंगरखा आणता येईल. स्कार्फ आणता येईल. बालवीर मेळाव्याला जाता येईल. फक्त दहा रुपयेच कमी पडत होते त्याचे द्यायला, तेवढी शिवणावळ दिली की झाले.

तो काठीने पाचोळा ढकलत होता. सागाची रुंद, सुकलेली जाळीदार पाने. फणसाची पिवळट पिकून पडलेली पानं. सुक्या छोट्या फांद्या. तो ढकलत होता. छोटे ढीग बनवत होता. आधी कुंपणाकडूनच त्याने साफ केलं. छोटे छोटे ढीग पेटवून दिले. धूर सर्वत्र पसरला. झाडा-माडातलं ऊन त्यामुळे दिसेनासं झालं. धूर वाढला म्हणून त्याने पोफळीकडून झाडायला सुरुवात केली. भराभर तो काम करत होता. घामाने भिजला होता, म्हणून त्याने अंगरखा काढून बाजूला ठेवला. पुन्हा काम सुरू झालं. दहा ढीग झाले की ते पेटवून टाकत असे.

रातंबीच्या झाडाखालचा पाचोळा गोळा करताना काहीतरी सळसळलं. त्याने फारसं लक्ष दिलं नाही. अंगावर ओंबील (ताबूस मुंगळे) चढत होते. गुदगुल्या होत होत्या. तो एका हातानं ओंबील झटकत होता. दुसऱ्या हातानं झाडत होता. तो लांब ढीग पण पेटू लागला. आग वाढली. समोरूनपण पाचोळा पेटत होता. तोच सळसळ जोरात वाढली. तसं त्याचं लक्ष गेलं. एक पिवळाजर्द नाग मान वर

करत होता. फूत्कार टाकत होता. पुढे-पुढे जात होता तो गेला आणि सागाकडेच्या आगीत होरपळला. तसा त्याने फणा काढला. अंतूने आईला हाक मारली. विहिरीवरच ती भांडी धूत होती. ती खाली आली. पाहते तर नाग. ती घाबरली. आपण कुणबी माणसं. नाग मेला तर... आपलं भलं होणार नाही...

तिने धावत जाऊन गंगाआजीला सांगितलं. काठी टेकत टेकत ती आली. पाहते तर, देवाच्या बाजूला आग वाढलीय. नाग फणा उचलतोय. पातेऱ्यावर मारतोय. तळमळतोय. तोच वारा आला. काटक्या जोरात पेटल्या आणि नागाने मान टाकली. अंतू आजीकडे



पाहून थरथरत होता. घामाने निथळत होता.

जड पावलाने आजी घराकडे गेली. मागोमाग लक्ष्मी, अंतूपण गेले.

"आता काय करायचं गो, काकू?" लक्ष्मी म्हणाली, तसा गंगाआजीचा पारा चढला. ती रागाने लालेलाल झाली. अंतूकडे पाहत म्हणाली, "चल, चालता हो इथून. तू खूप भयंकर काम केलं आहेस. माझ्या घरचा राखणदार नाग तू मारला आहेस..."

लक्ष्मी लटलट कापू लागली. अंतू पायऱ्या उतरू लागला. खांबाला धरून उभी राहत आजी म्हणाली, "अंत्या, एक पैसासुद्धा मिळायचा नाही तुला. परत कधी कामाला येऊ नकोस. राखणदार गेला. अरिष्ट कोसळणार आता."

इतक्यात शंकरकाका आले. त्यांनी काळी टोपी काढून खुंटीवर ठेवली. झोपाळ्यावर झोका घेऊ लागले. तो झोका पाहतच अंतू बेड्याकडे गेला. रातंबीपासून पुढे गेला. आता सायंकाळी शिंप्याला पैसे कोठून देणार? अंगरखा कसा मिळणार? असे विचार त्याच्या मनात येत होते. ते फूत्कार, तो नागाचा फणा त्याला आठवत होता.

ऊन खूप वाढले होते. भुकेने व्याकुळ झालेला अंतू भराभर पावले उचलत होता. काम करूनही त्याला पैसे मिळाले नव्हते. तोच रामू शिंप्याचं घर आलं. अंतू हळूच गेला. घडलेला प्रसंग त्याला सांगितला. रामू शिंपी म्हणाला, "अंतू, हे घे कपडे. पैशाचं नंतर पाहू. मेळाव्याला जा."

अंतू बांधावरून खाली उतरला. तो नवा अंगरखा त्याने छातीशी कवटाळला. स्कार्फ मिळाला. अंगरखा मिळाला. मेळाव्याला जायला मिळणार म्हणून त्याला खूपच आनंद झाला.

*

म. ग्रं. सं. ... ग्रंथालय शाखा.
... २९६१ ... ३९।३।९८
विषय ... ग्री. बा. ...

# फाटकवाडीची होळी

थोडे खाली, थोडे वर. फिरत राहायचे गरागर. अरुंद रस्ता लाल धुळीचा. वळत वळत जायचा. छोटे घाट, उभे कडे. उंच उंच उभी झाडे. हिरवी पाने, हिरवी राने. या रानातून पक्षी गातात गोड गोड गाणे. गाणे वडावर. गाणे पिंपळावर. आंबा, फणस सारीकडे गाणेच गाणे. या गाण्यात, हिरव्या पानांत बसलीय छोटी वाडी. या वाडीचं नाव फाटकवाडी.

सात-आठ घरांचीच वाडी. वाडीत एक इमारत कौलारू. पांढरट रंगानं रंगवलेली. ही इमारत आहे शाळेची. ही शाळा आहे या वाडीची शान.

छोटा रोशन याच शाळेत जातो. खूप खूप अभ्यास करतो. वळणदार अक्षर काढतो. कविता म्हणतो. गाणी गातो. सुंदर सुंदर चित्रंही काढतो. त्याला त्याच्या गावाचा, गावातल्या मित्रांचा, छोट्याशा शाळेचा वाटतो अभिमान. जीवन शिक्षण विद्यामंदिर, फाटकवाडी. ही शाळा त्याचं आवडीचं ठिकाण. कधी खेळायला, कधी फिरायला, कधी गप्पा मारायला म्हणून तो यायचा. सतत शाळेतच राहायचा.

सावंत मास्तर आणि राणेबाई ही रोशनची दैवतं. तो रोज मित्रांसोबत यायचा. शाळेजवळ सावंत गुरुजी भेटायचे. त्यांना गोष्टी सांगायचे. या वर्षी इथल्या मुलांनी होळी साजरी केली. फाटकवाडीची होळी. वेगळी होळी म्हणून तिची सारीकडे चर्चा झाली. इथंच आहे पण

दिसत नाही. जवळच आहे पण ओळखत नाही, अशी आपली अवस्था. का व्हावं असं? यातून काहीतरी मार्ग काढावा, म्हणून सावंत मास्तरांनी मुलांना एकत्र बोलावलं. त्यांना सारं समजावून सांगितलं.

होळीचा दिवस उजाडला. पहाटेलाच रोशन उठला. मित्रांना जमवलं. नारळाच्या काड्यांचे झाडू घेतले. प्रथम शाळेचा परिसर झाडून काढला. मग शहनाजच्या घराभोवतीचा पाचोळा गोळा केला. नथू फाटक, आश्विनी फाटक, राणेबाईंचं घर या सर्वांभोवतीचा पाचोळा गोळा झाला.सुक्या काटक्या, घाणेरडे कागद, रानशेणी साऱ्या एकत्र झाल्या. दहा जणांनी हे सारं काम केलं.

राणू फाटक हे फाटकवाडीचे प्रमुख आहेत. त्यांनी मुलांचं काम पाहिलं. हातात कोयती घेऊन ते आले. मुलांना म्हणाले, "चला रे, सर्वांनी मिळून जाऊया. पोफळीचं झाड तोडून आणूया. आज आपण होळी साजरी करायची."


सारी मुलं शांत होती. कोणीच काही बोलत नव्हतं. जागचं हलत नव्हतं. इतक्यात माधव फाटक आले. त्यांनीही मुलांना बोलावलं, पण कुणीच काही बोलेना. अखेर रोशन पुढे आला आणि म्हणाला, "माधव आबा, आम्ही येणार नाही. पोफळीचं झाड तोडू देणार नाही. पालापाचोळा, घाणेरडे कागद आम्ही पेटवणार. जिवंत झाड वाचवणार."

राणू फाटकांना याचा राग आला. ते म्हणाले, "हे चालायचं नाही. दरवर्षीप्रमाणे झाड तोडलंच पाहिजे. होळीचं झाड नाचवलंच पाहिजे."

ते प्रत्येकाच्या घराकडे गेले. सर्वांना पटवून सांगू लागले. पण त्यांची पत्नीच म्हणाली, "जर आज झाड तोडलं तर मुलं होळीला येणार नाहीत. घरी कुणी जेवणार नाहीत." प्रत्येक घरात राणू फाटकांना हेच ऐकायला मिळालं. ते सावंत मास्तरांकडे गेले. त्यांनी

मुलांविषयीची तक्रार केली.

मास्तर शांत बसले होते. ते म्हणाले, "राणबा, मुलं म्हणतात ते खरं आहे. झाडं जिवंत असतात. त्यांना हिरवीगार पानं असतात. पिवळी, लाल फुलं असतात. मधुर फळं येतात. ऊन असो, वारा असो, ती कधी तक्रार करत नाहीत. कधी थकत नाहीत. अशा जिवंत झाडांना तोडू नये. आपल्यालाच तोडून कुणी खेळणं बनवलं तर चालेल का ?"



राणबा फाटकांच्या आता सारं लक्षात आलं. मुलांमागे हे मास्तर आहेत तर ! ते निराश झाले. घराकडे गेले. त्यांनी खूप विचार केला. अखेर त्यांनाही ते पटलं.

मुलांनी सर्वांच्या घराभोवती शेणाचे सडे टाकले. मुलींनी रांगोळ्या काढल्या. सर्वजण शाळेजवळच्या पटांगणात जमले. होळीच्या खुंटाला आग लावण्याचा मान राणबा फाटकांचा.

रोशन उठला. त्याच्या मागे दोन-तीन मुलं गेली. त्यांनी राणबाकाकांना बोलावून आणलं. सावंत मास्तर पण आले होते. राणबा फाटकांनी पाचोळ्याला आग लावली. ज्वाला निघू लागल्या, तसा मुलांनी आगीभोवती फेर धरला.

*जाळूया जाळूया*
*निके सारे जाळूया.*
*जगवूया जगवूया*
*जिवंत झाडे जगवूया.*

मुलं गाणं गात होती. नाचत होती. शेवटी ज्वाळा विझल्या. मुलं थांबली. एक वेगळीच होळी साजरी झाली. राणबा फाटकांनी मुलांचं कौतुक केलं. मास्तरांचं कौतुक केलं. यापुढे होळीला वाडीत झाड तोडणार नाही, झाड जाळणार नाही, असं सर्वांनी ठरवलं.

हे सर्व पाहून रोशनला खूपच आनंद झाला होता.

*

# लळा

शेतातल्या गवी आंब्याच्या सावलीत माधवी आंबे वेचत होती. कच्च्या कैऱ्या खाली पडल्या होत्या. काही रोगट तर काही डागाळलेल्या. भराभर परकराच्या ओच्यात तिने त्या वेचून घेतल्या. ओचा सावरत माझ्याजवळ आली आणि म्हणाली,

"काका, मी केवढे आंबे आणलेत बघा."

"अग, हे तर कच्चे आंबे आहेत. हे खायचे नसतात." मी म्हणालो.

तिचा चेहरा हिरमुसला. तिने ओचा खाली सोडला. आंब्यांचा ढीग जमिनीवर पडला. घामाघूम होऊन ती तशीच खाली बसली.

आठ वर्षांची माधवी. माझी पुतणी. सहा वर्षांनंतर मुंबईहून आली होती. तिने एवढे आंबे पाहिलेच नसावेत. चांगले-वाईट याचा विचार न करता तिने गोळा केले. एवढ्यात टपकन एक पिकलेला आंबा खाली पडला. ती झटकन उठली. तो आंबा उचलून घेऊन आली. पिवळा धम्मक. चांगला तयार झालेला होता. खारीने खायला सुरुवात केल्याबरोबर खाली पडला. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहत मी म्हणालो,

"माधवी, हा छान आहे आंबा. तुला खारीने दिला बघ. तू मुंबईहून आलीस हे समजलं तिला."

ती खूप वेळ खारीकडे पाहत होती. प्रत्येक फांदीवरून नजर फिरवत होती. तिला खार काही दिसेना. ती हळूच झाडावर चढली. तिच्यासोबत अनंत पण होता. ते दोघे शोधत होते. त्यांनी आंब्याच्या



अनेक फांद्या शोधल्या. अखेर एका फांदीवर त्यांना घरटं दिसलं. भातकाड्या, कापूस, कपड्याचे तुकडे यांचा एक गोळा फांदीत अडकला होता. फांदी हलताच आतून चिवऽ चिवऽ असा आवाज आला. अनंत पुढे जात म्हणाला,

"ताई, हे बघ खारीचं पिल्लू."

ती पुढं गेली. तिने त्याला धरण्यासाठी हात पुढे नेला. तोच तो

म्हणाला, "ताई, थांब. नको धरूस या पिल्लाला. त्याची आई घरात घेणार नाही त्याला !"

माधवीला काहीच समजलं नाही. ती पिल्लाला म्हणाली, "तू मला पिकलेला आंबा दिलास ना. छान आहे अगदी !"

ते पिल्लू इवले इवले डोळे टवकारून तिच्याकडे पाहत होतं. तीही त्याच्याकडे एकटक पाहत होती. बऱ्याच वेळाने माधवी-अनंत खाली आले. तिने मला सर्व काही सांगितलं. तिच्या भोळेपणाचं मला हसू येत होतं. मी गप्प बसून राहिलो. काही वेळाने आम्ही घराकडे निघून गेलो.

दुसरा दिवस उजाडला. सकाळीच माधवी उठली. अनंताला घेऊन ती शेताकडे गेली. आंब्याच्या झाडाजवळ गेल्यावर तिला चिवऽ चिवऽ असा आवाज ऐकू आला. तिला वाटलं, ते पिल्लू आपल्याला बोलावत आहे. ती घरट्याकडे पाहू लागली. त्या पिल्लाची आई फांदीवर बसून पुढील पायाने तोंड साफ करत होती. तोच एक मंद वाऱ्याची झुळूक आली. टपकन् आंबा खाली पडला. धावत जाऊन तिने तो उचलला. त्यावरील पिल्लाचे दात पाहून तिला खूप आनंद झाला. ती त्याला शोधू लागली. या फांदीवरून त्या फांदीवर; परंतु पिल्लू तिला दिसलं नाही. निराश होऊन ते दोघे घरी परतले.

दुपारी त्या दोघांनी चण्याची डाळ विकत घेतली. भर उन्हात ते शेताकडे गेले. आई त्यांना न जाण्याबद्दल किती सांगत होती; पण आईचा डोळा चुकवून ते गेले. हळूहळू ती झाडावर चढली. अनंता पुढे, ती मागे. अगदी फांदी न हलवता ती घरट्याजवळ गेली. 'चिवऽ चिवऽ' करून तिने त्या पिल्लाला बोलावलं. इवले इवले डोळे हलवत पिल्लू बाहेर आलं. माधवीने त्या फांदीवर ठेवलेले चण्याचे डाळे त्याने खाल्ले. तिला खूप आनंद झाला. ती खाली उतरली. दोघंही सावलीत

बराच वेळ गप्पा मारत बसले. ते घरी जायला निघणार तोच एक पिकलेला आंबा खाली पडला. पाठोपाठ पिल्लाचा चिवचिव असा आवाज आला. आंबा उचलून त्या फांदीकडे न पाहता ते घरी परतले.

सात-आठ दिवस निघून गेले. दररोज खाणं, पिल्लाशी खेळणं, त्याला खायला देणं यामुळे त्यांच्यात खूपच मैत्री झाली. माधवीचे गोड शब्द बाहेर पडताच पिल्लू घरट्याबाहेर यायचं, थांबायचं, याचं आम्हालाही आश्चर्य वाटे. त्याचा तिला अगदी लळा लागला होता.

त्या दिवशी संध्याकाळी गाडी घेऊन माधवीचे वडील आले. उद्या आपण मुंबईला निघायचं, असं त्यांनी तिला सांगितलं. तिला मात्र वाईट वाटत होतं. मोकळी हवा. उंच आंब्याचं झाड. खारीचं पिल्लू... सारं तिला आठवत होतं. रात्री ती झोपेतही बरळत होती, 'अरे चल... खा ना... खा ना... मी उद्या जाणार आहे मुंबईला. घे... घे...' आई जागी होऊन पाहत होती. तिला हाक मारत होती. तोच तिने कूस बदलली आणि ती झोपी गेली.

दुसरा दिवस उजाडला. माधवी सकाळीच उठली. शेताकडे निघून गेली. तिने पिल्लासाठी नेलेले शेंगदाणे फांदीवर ठेवले. त्याला आपण गावी जाणार असल्याचं सांगितलं. त्यानंही त्या दिवशी शेंगदाणे खाल्ले नाहीत. ती डोळे पुसत होती. त्याला खाण्याचा आग्रह करत होती. अखेर तिला राहवलं नाही. तिने पिल्लाला पकडलं. त्याला गोंजारलं. गाल नाकाशी नेऊन त्याचे मुके घेतले. हळूच फोडून शेंगदाणे त्याच्या तोंडात घातले. पिल्लानेही ते खाल्ले. आनंदित होऊन ती खाली उतरली.

खूप वेळ ती त्या घरट्याकडे पाहत होती. तोच सरसर करत अतीवेगाने ते पिल्लू खाली आलं. पुन्हा वर गेलं. ती जिथं उभी होती,

तिथं एक पिवळा धम्मक आंबा खाली पडला. तिने जाऊन तो उचलला. टपकन काहीतरी वाजलं. तिने मागे वळून पाहिलं. तिचं लाडकं पिल्लूही खाली पडलं होतं. थोडा वेळ ते निपचित पडून होतं. ती एकदम किंचाळली. त्याच्याजवळ गेली. तिला भोवळ आल्यासारखं वाटू लागलं. बराच वेळ ती त्याच्याकडे पाहत होती. खोपीकडे जाऊन तिने पाणी आणलं. त्याच्यावर शिंपडलं.

पिल्लाने डोळे उघडले. ते तिच्याकडं पाहू लागलं. त्याचं पोट अजूनही हलताना दिसत होतं. तिने त्याला उचलून घेतलं. त्याला परकरानं पुसलं. हळूहळू ती झाडावर चढली. घरट्यात तिने त्याला अलगद ठेवलं. ती खाली उतरली.

तिचे डोळे भरून आले होते. लांब जाईपर्यंत ती त्या झाडाकडे पाहत होती. मागे वळत होती. पुन्हा चालत होती. त्याने दिलेला आंबा एका हातात. . . दुसरा हात डोळे पुसण्यात गुंतलेला. . . असं करत ती घरी पोहोचली.

सर्वांच्या बॅगा आवरून झाल्या. तिने तो आंबा आपल्या रुमालात बांधून घेतला. बाबांजवळ जाऊन ती म्हणाली, "बाबा, आजचा दिवस थांबूया ना हो. माझं खारीचं पिल्लू झाडावरून पडलं."

तिचा गळा दाटून आला होता. वडिलांना हे काही समजत नव्हतं. त्यांना उद्याचं त्यांचं ऑफिस दिसत होतं. त्यांनी तिचं काही न ऐकता सर्व साहित्य गाडीत नेऊन टाकलं. घरातील सर्वांचा निरोप घेऊन तिची आईही गाडीत जाऊन बसली. गाडीचं दार बंद झालं. खिडकीतून हात बाहेर काढून तिची आई निरोप घेत होती. अनंत माधवीला हाक मारत होता. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. गाडी सुरू झाली. ती म्हणाली,

"अनंत, पिल्लू बरं होईपर्यंत त्याला रोज भेटत जा. त्याला खायला

हे डाळे दे. . ." म्हणून एक छोटंसं डाळ्यांचं गाठोडं तिने त्याच्या हाती दिलं. ती मुसमुसू लागली. आणि गाडी निघाली. गाडी वळणावर जाईपर्यंत अनंत हात हलवून तिला निरोप देत होता. त्याचेही डोळे भरून आले होते.

*

# एक म्हातारा, दोन शेळ्या

एक होती झोपडी. तिच्यात एक म्हातारा राहायचा. त्याचं नाव होतं जोतिबा. त्याने दोन शेळ्या पाळल्या होत्या. एक शेळी होती काळी. दुसरी होती पांढरी. पांढरी शेळी हिरव्या गवतात चरायची. कोवळी पानं खायची. झऱ्याचं पाणी प्यायची. मजेत राहायची; पण काळ्या शेळीच्या रंगाकडे बघून नाक मुरडायची.

याउलट काळी शेळी कातळावर जायची, काटेरी झुडपांतला पाला खायची. कातळाच्या डबक्यातले पाणी प्यायची. आपल्या रंगाकडे पाहून रडत बसायची.

'काळी शेळी बारीक का होते ?'

'पांढरी शेळी टम्म कशी फुगते ?'

हे जोतिबाला समजेना. तो खूप विचार करी. शेळ्यांचं निरीक्षण करी, पण त्याला काही उमगेना. खूप दिवस निघून गेले. पांढऱ्या शेळीला दोन पिल्लं झाली. त्यांतील एक होतं पूर्ण काळं दुसरं होतं पांढरं काळं. पिल्लाचा रंग पाहून पांढरी शेळी चिडली. चिडून, डोळे लाल लाल करून ती गेली शेजारच्या आजीच्या घरी. तिथल्या आजीला म्हणाली,

"मी काय चूक केली ? मला का शिक्षा व्हावी ? मलाच काळी पिल्लं का व्हावीत ?"

ते ऐकून आजी केवळ हसली आणि म्हणाली,

"तुला पाय किती ?"

"चार"

"शिंगं किती ?"

"दोन."

"डोळे किती ?"

"दोन."

"शेपट्या किती ?"

"एक."

"पाय, डोळे, कान, शेपटी यांत फरक आहे काय ?"

"नाही." पांढरी शेळी म्हणाली.

"म्हणूनच तर तुझा आणि तुझ्या पिल्लांचा रंग सारखा नाही." आजी म्हणाली, "तुझं काही चुकलं नाही. चार दिवस कातळावर जा. झुडपं शोध. पाने खा. म्हणजे सुचणार नाही रंग. होशील मिळेल त्या खाण्यात दंग."

"हो." म्हणून पांढरी शेळी कातळावर निघून गेली.

काळी शेळी पण व्याली. तिला एकच पिल्लू झालं. ते जन्मापासून आंधळं होतं. शेळी अगदीच घाबरली. शेजारच्या आजीकडे गेली आणि म्हणाली, "आजी, आजी, माझं एक काम कर."

आजी म्हणाली, "काय ?"

"मला काटे नसलेल्या झुडपांचं रान दाखव."

"कशाला ?"

"काय सांगू बाई, मला एक पिल्लू आहे. जन्मापासून आंधळं आहे. आम्ही काटेरी झुडपाचा पाला खातो. आमची आजी याच झुडपाचा पाला खायची. आमची पणजी पण याच झुडपाचा पाला खायची; परंतु आम्हा सर्वांना डोळे होते. माझ्या पिल्लाला दिसत नाही. ते कसं खाणार ? काळं-बेंदरं कसंही असलं तरीही ते पोटचं पिल्लू ! सांग ना आजी, असं रान कुठं आहे ?"

आजी म्हणाली, "घाबरू नकोस. डोंगराच्या पलीकडे जा. तिथं एक म्हातारा आहे. त्याला प्राणिमात्रावर प्रेम करायला आवडतं. तो तुला वाट दाखवील."

काळी शेळी त्या म्हाताऱ्याला भेटली. तो म्हणाला, "तू खरी आई आहेस. पिल्लासाठी जी जगते ती खरी आई. तू माझीही आई आहेस." म्हणून तिच्या अंगावरून त्याने हात फिरवला. काळी शेळी आनंदून म्हणाली,

"रंग काळा की रंग गोरा. मला काय त्याचं. माझे डोळे असून मी पाहत नाही. कारण मी पाहीन ते मला मिळत नाही. त्यापेक्षा हे किती छान ! ज्यांना डोळेच नाहीत त्यांना मिळवायची गरजच नाही. किती सोपं आहे." म्हणत शेळी जोतिबाच्या झोपडीकडे गेली.

सायंकाळ झाली. जोतिबाने शेळ्या बांधल्या. पिल्लांना घरात सोडून दिलं. दोन्ही शेळ्यांची पिल्लं एकत्र खेळत होती. बागडत होती. हे बघून पांढरी शेळी मात्र रडत होती. मात्र तिचं हे रडणं आनंदाचं होतं. कारण एवढं सुंदर दृश्य तिनं कधीच पाहिलं नव्हतं.

*

# साहसी नुसरत

झाडांची दाट गर्दी. गर्दीत हरवलेली छोटी छोटी घरं. घरावर घरं. त्यामागे डोंगर. डोंगर हेच या गावाचं नाव आहे. या डोंगरगावात एक वाडी आहे. मुसलमानवाडी असं तिचं नाव आहे.

खाडीच्या टोकावर वसलेली छोटी घरं. खाडीतलं पाणी थेट अंगणाच्या कठड्याला लागतं. भरती आली की पाणी वाढतं. अंगणातल्या पायऱ्यांवर पाणी नाचत राहतं. वाऱ्यासोबत लाटा येतात. खळ्कन फुटतात. प्रत्येकाच्या घरासमोर खांबाला बांधलेली दिसते छोटीशी होडी. दोन-चार माणसे बसतील एवढीच. एका बाजूला ऊंडल डोलत असते, तर दुसरीकडे होडी मागंपुढं करत असते.

मुसलमानवाडीच्या टोकाच्या घरात नुसरत राहते. आठवीत शिकणारी. गोरीपान, देखण्या डोळ्यांची टवटवीत मुलगी. आजोळी एकटीच राहते. आजी-आजोबांना मदत करते. कधी घरकामात, कधी मासे उतरवण्यात, तर कधी बाजारातून वस्तू आणण्यासाठी. म्हातारे सलामशेट तिचे आजोबा. या वाडीतला एक परोपकारी माणूस म्हणून सर्वांना परिचित आहेत.

नुकत्याच परीक्षा संपल्या होत्या. नुसरत एकटीच अंगणातल्या सावलीत वाचत बसली होती. बाहेर ऊन रणरणत होतं. मध्येच गार झळा अंगाला भाजून काढत होत्या. भरतीही चांगलीच आली होती. पलीकडच्या काठावरचे धुण्याचे दगडही बुडाले होते.

तरीही पलीकडचं कदंबाचं झाड तिचं लक्ष वेधून घेत होतं

त्याखाली दोघीजणी धुणं धूत होत्या. त्यांच्याजवळ दोन मुलंपण होती. ती पाण्यात नाचत होती. उड्या मारत होती. पाणी एकमेकांच्या अंगावर उडवत होती.

नुसरतला त्यांचा खेळ पाहून मजा वाटली. ती एकटक पलीकडे पाहत होती. कधी कदंबाचं झाड, कधी धुणं धुणाऱ्या बाया, तर कधी ती छोटी छोटी मुलं. तोच अचानक वारा सुटला. दुपारी असा जोराचा वारा ती प्रथमच पाहत होती. झाडे जोरात हलत होती. लाटा उंच उंच जात होत्या. अगदी एक लाट तर तिच्या अंगणात येऊन आदळली. शेणानं सारवलेली सारी जमीन ओली झाली. मध्येच तिला एक कर्कश किंकाळी ऐकू आली. डोळ्यांवर हात धरून तिनं पाहिलं. पलीकडच्या स्त्रिया तिला पुसटशा दिसत होत्या. त्यांतील एक स्त्री पाण्यात उतरली होती. तिचा पदर अर्धवट वाऱ्यावर उडत होता. त्या दोन मुलांतलं एक मूल पाण्यात पडलं होतं. त्या दोघींची एकच आरडाओरड सुरू होती.

नुसरतनं हे पाहिलं. तिनं पुस्तक बाजूला टाकलं. आजोबांच्या होडीची दोरी सोडली. हातात वल्हं घेतलं आणि तिनं होडी लकटली. होडी खालीवर होऊ लागली. मागे मागे येऊ लागली. लाटांवरून मधे जाईपर्यंत तिला काहीच वाटलं नाही, पण पुन्हा जोराचा वारा सुटला. एक लाट तर थेट होडीत आली. उंडल वर उचलली. त्या लाटेच्या तडाख्यानं ती भिजली. तिला दरदरून घाम फुटला, पण ती घाबरली नाही. तिने शांतपणे वल्हं मारणं चालूच ठेवलं. पलीकडचा काठ जवळ दिसू लागला.

ती हळूहळू जाऊ लागली. वल्हे मारून तिचे हात भरून आले होते. त्या बुडणाऱ्या मुलाला तिने वर ओढलं. नाकातोंडात पाणी गेलेली ती देसायांची छोटी नात होती. सहा वर्षांची सुंदर मुलगी. होडी काठाला

लागली.

त्या स्त्रिया धावतच तिच्याकडे आल्या. त्यांनी मुलीला उचलून घेतलं. तोच देसायांचा अनिल आला. त्यानं मुलीला पालथं झोपवलं, पाठीवर दाब देऊन पाणी बाहेर काढलं. इतक्यात देसाईवाडीतली सारी माणसं गोळा झाली. ज्याला कळेल तो येत होता. झाला प्रकार पाहत होता. थोड्या वेळाने वाडीतले सावंत डॉक्टर आले. त्यांनी गर्दी बाजूला केली. वारा घातला. बऱ्याच वेळानं ती छोटी हातपाय हलवू लागली. डोळ्यांची उघडझाप करू लागली. देसाई काकूंचा चेहरा उजळला. संकट टळलं. नुसरतलाही खूप आनंद झाला. इतक्यात तिच्याकडं काकूंचं लक्ष गेलं.

त्यांनी तिला जवळ घेतलं. तिची पापी घेतली. आजूबाजूचे लोक पण पाहू लागले. वाऱ्यातून, लाटांतून एकट्या मुलीनं होडी आणल्याबद्दल तिचं कौतुक करू लागले. सलामशेटची साहसी नात म्हणून तिला शाबासकी देऊ लागले.

एवढ्यात लखू आला. अनिल देसाईनं त्याला नुसरतला पोहोचवायला सांगितलं. लखूनं ताज भरली. छोटी नुसरत होडीत बसली होती. तिचे गोरे गोरे गाल गुलाबी झाले होते. कोठून आपल्यात एवढं साहस निर्माण झालं हे तिला समजत नव्हतं.

काठावर येऊन ती पोहोचली, तोच तिचे आजोबा घरातून बाहेर आले. तिला बघून ते गोंधळले, पण लखूनं घडलेला प्रकार सांगितला. सलामशेटना खूप आनंद झाला. त्यांनी तिला प्रेमानं जवळ घेतलं. तिची पाठ थोपटली.

*

म. ग्रं. सं. ठाणे,
२९६९
BVBK-0402961